SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 Email - affiliation1@unishivaji.ac.in
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९२२९४ व २६९२३३३.
Estd: 1962
NAAC 'A' Grade

एसयु संलग्नता/टे.१/वंगार/1437

दिनांक 28/03/2020

# परिपत्रक

**विषय** - कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) चा संसर्ग होवू नये व प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत.

**संदर्भ** - १. D.O.No. Secy(MHRD/2020 New Delhi, Dtd. 21st March 2020
२. विद्यापीठ अनुदान आयोग F.No.२०२० (Website), Dtd.२१/०३/२०२०
३. जिल्हादंडाधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय यांचा आदेश क्रं. कार्या-७/गृह/पोल/एसआर-०५/२०२० दि. २२/०३/२०२०
४. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्रं. उशिसं/कोरोना/मवि-०१/२०२०/३८१९/४०४२, दि.२३/०३/२०२०.
५. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचे पत्र क्र.विसस/अशि/कोवि/२०२०/१२०३, दि.२३/०३/२०२०.
६. विद्यापीठाचे परिपत्रक क्रं.जा.क्र. आस्थापना/डब्ल्यु एच-०१, दि. २३/०३/२०२०.
७. शिवाजी वि./संलग्नता टी.१/प्रशांत/१४३६, दि.२३/०३/२०२० चे परिपत्रक
८. विद्यापीठाचे परिपत्रक क्रंजा.क्र.आस्थापना/८४९, दि.२३/०३/२०२०.
९. गृह विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्रं 40-3/2020-DM-1(A), Dtd.24/03/2020.
१०. महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापनण मदत व पुनर्वसन विभाग महाराष्ट्र शासन याचे पत्र क्रं. DMU/२०२०/cr.९२/DisM-१, Dtd.२५/०३/२०२०.

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा संसर्ग होवू नये व प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने शासनाने विविध निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरून विद्यापीठ अधिविभाग तसेच सर्व सलग्नित संस्था व महाविद्यालये दि. ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

याबाबत, संदर्भ क्रं. ९ अन्वये गृह विभाग भारत सरकार तसेच संदर्भ क्रं. १०. अन्वये महाराष्ट्र शासन यांचेकडून नव्याने प्राप्त झालेल्या निर्देशास अनुसरून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

विद्यापीठाच्या अधिनस्त सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था व महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवर काम करणारे सर्व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) चा संसर्ग होऊ नये व त्याचा प्रादुर्भाव/ प्रसार वाढू नये याकरीता प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये दि. १४ एप्रिल २०२० पर्यंत बंद राहतील, सदर कालावधीत सर्व संचालक/प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर व कर्मचारी यांनी घरी बसूनच आवश्यक ती शैक्षणिक कामे करावीत. तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता महाविद्यालयास एखाद्या शिक्षक/अधिकारी/कर्मचाऱ्यांची गरज भासल्यास संचालक/प्राचार्य यांच्या आदेशानुसार संबधित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना महाविद्यालयात आवश्यकते नुसार उपस्थित राहणे बंधनकारक राहिल याची नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे संदर्भ क्रं. ८ प्रमाणे अत्यावश्यक सेवेतील महाविद्यालयातील ,सेवा सुरळीत राहण्याबाबत योग्य ती खबरदारी घेणेत यावी.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव